ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT

Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष ३१ पुणें, बुधवार, ३ मार्च, १९६५ अंक ५

(OICO-I HIN)

# नहीं–
# यह कोई
# साधारण कार्य नहीं!

## सरदार
### सोडा वाटर
### यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण हैं : १. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**



नवल सोडा वाटर यंत्र

घरेलू सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

सर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन : कार्यालय : २५२३७१ कारखाना : ४०८१२

### राहणीच्या दर्जात सुधारणा झालेली नाहीं.

नियोजन समितीनें लोकांच्या राहणीच्या दर्जात सुधारणा झाली आहे किंवा नाहीं हें पाहण्यासाठी तपासणी केली असतां असें आढळून आलें आहे कीं, तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या पहिल्या तीन वर्षांत तरी दरडोई वस्तूंच्या वापरांत सुधारणा झालेली नाहीं. १९६०–६१ च्या किंमती आधारासाठी घेतल्या तर त्या सालीं दरडोई राष्ट्रीय उत्पन्न सुमारें ३२० रुपये होतें. दरडोई दरसाल सरासरी २७० रुपयांच्या वस्तु वापरल्या जात असत. दरमहाचा हिशेब केला तर हा, खर्च २३ रुपयांपेक्षाहि कमी आहे आणि दररोजच्या खर्चाच्या दृष्टीनें तो जेमतेम ७७ पैसे पडतो. तिसरा पंचवार्षिक कार्यक्रम चालू झाल्यानंतर ह्या दरडोई खर्चांत कांहींच सुधारणा अद्यापपावेतों झालेली नाहीं. दरमहा २३ रुपयांचा दरडोई खर्च हा सध्यांच्या परिस्थितीचा विचार करतां, अत्यल्प असून त्यावरून देशांत पसरलेल्या दारिद्र्याची चांगली कल्पना येते. परंतु खरी परिस्थिति ह्या आंकड्यावरून नीटशी कळत नाहीं. राष्ट्रीय उत्पन्नाची दरडोई सरासरी दाखवते त्यापेक्षा ती खूपच निकृष्ट आहे. बहुसंख्य म्हणजे शेंकडा ६० टक्क्यांपेक्षाहि अधिक लोक दरमहा २५ रुपयांवर आपली गुजराण करीत आहेत आणि जवळजवळ एकतृतीयांश लोक दरमहा १५ रुपयांपेक्षाहि कमी खर्चांत भागवीत आहेत. नियोजन समितीनें केलेल्या हिशेबाप्रमाणें येत्या १० ते १५ वर्षांपर्यंत राष्ट्रीय उत्पन्नांच्या वाढीचा वेग दरसाल ७ टक्के राहिला तरीसुद्धां दरमहा दरडोई २० रुपये खर्च करण्याचें मर्यादित उद्दिष्ट साध्य करतां येईल. समतोल आहाराविषयीं सल्ला देणाऱ्या कमिटीनें जो अभ्यास केला आहे, त्याप्रमाणें समतोल आहार घेण्यासाठी दरमहा दरडोई ३५ रुपये खर्च येईल. इतका खर्च तर बाजूलाच राहिला; पण, आहाराचा बेताचा दर्जा राखण्याची ऐपतसुद्धां लोकसंख्येपैकी २० टक्क्यांपेक्षाहि कमी लोकांच्या आवाक्यांत आहे.

---

### हिंदी तारांची सोय लोकप्रिय झाली नाहीं

विदर्भ भागापुरत्या आंकड्यांचा विचार करतां त्या भागांत हिंदी तारा पाठविण्याची सोय लोकप्रिय झालेली नाहीं, असा निष्कर्ष काढावा लागतो. १९६२–६३ सालीं विदर्भांतील पोस्टाच्या कचेऱ्यांतून ७·३६ लाख तारा पाठविण्यांत आल्या. विदर्भांत ८ जिल्हे आहेत. त्या तारांपैकी अवघ्या ९,०९३ तारा हिंदींतून नोंदण्यांत आल्या होत्या. त्यांतहि १,६०० तारा वृत्तपत्रांना धाडण्यांत आलेल्या मजकुराच्या होत्या. १९६३–६४ सालीं हिंदींतून पाठविण्यांत आलेल्या तारांची संख्या आणखीच घटली. एकूण ७·४२ लाख तारा धाडण्यांत आल्या. त्यांपैकी फक्त ८,६०० तारा हिंदींतून केलेल्या होत्या. त्यांतहि १,९०० तारा वृत्तपत्रांना धाडलेल्या मजकुराच्या होत्या. अलीकडे करण्यांत आलेल्या पाहणीवरून लोक इंग्रजींतूनच तारा करण्याचें पसंत करतात असें दिसून आलें. इंग्रजींत तार करण्यामुळें ती थोडक्या शब्दांत होते आणि त्यामुळें खर्चांत बचत होते.

---

### त्याला म्हणावें म्हातारपण

"तुमची स्मरणशक्ति कमी झाली, तुमचा अनुभव वाढला, तुम्हांला धाप लागली, तुमची दृष्टि मंदावली, आणि तुमची सेफ डिपॉझिट बॉक्स भरगच्च असली, म्हणजे त्याला म्हणावें म्हातारपण."

—"बँकिंग"


## दि बेळगांव बँक लिमिटेड

आतां मुंबईत !

बँकेची मुंबई शाखा २५ मार्च, १९६५ रोजीं प्लॉट नं. ४३, नरसीनाथा स्ट्रीट, मांडवी, मुंबई–९ येथें उघडण्यांत आली आहे.

## बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना : १९३० ] [ शेड्यूल्ड बँक

रजिस्टर्ड कचेरी : रविवार पेठ, बेळगांव.

म्हैसूर, महाराष्ट्र आणि गोवा प्रांत एकूण ३८ शाखा

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. दहा लक्ष |
| वसूल भांडवल | रु. आठ लक्ष |
| गंगाजळी | रु. सात लक्ष |
| ठेवी | रु. २ कोटी, ७२ लक्ष |
| खेळतें भांडवल | रु. ३ कोटी, १६ लक्ष |

: संचालक मंडळ :

१ श्री. एस. व्ही. कलघटगी, चेअरमन
२ श्री. बी. आर. पोतदार, व्हाइस चेअरमन
३ श्री. एस. एन. मुतुर
४ श्री. एम. जी. हेरेकर
५ श्री. जी. व्ही. सराफ, बी. ए., एलएल. बी.
६ श्री. ए. आर. नाईक, बी. ए., बी. एससी., एलएल. बी.

श्री. एच्. एस्. कुलकर्णी, जनरल मॅनेजर

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.


---


Statement about ownership and other particulars about newspaper 'ARTHA' to be published in the first issue every year after last day of February.

FORM IV

(See Rule 8)

1. Place of publication 823, Shivajinagar, Poona 4
2. Periodicity of its publication — Fortnightly
3. Printer's name — S. V. Kale.
   Nationality — Indian
   Address — 823, Shivajinagar, Poona 4
4. Publisher's name — S. V. Kale
   Nationality — Indian
   Address — 823, Shivajinagar, Poona 4
5. Editor's name — S. V. Kale
   Nationality — Indian
   Address — 823, Shivajinagar, Poona 4
6. Names and addresses of individuals who own the newspaper and partners or shareholders holding more than one per cent of the total capital — S. V. Kale 823, Shivajinagar, Poona 4

I, Shripad Vaman Kale, hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Date 3-3-1965 S. V. Kale
Signature of Publisher.

# अर्थ

बुधवार, ३ मार्च, १९६५



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## किंमतीविषयींचें धोरण आणि आर्थिक विकास

व्यावहारिक आर्थिक संशोधनाच्या राष्ट्रीय मंडळाचा वर्षदिन दिल्ली येथें साजरा करण्यांत आला. ह्या दिनाच्या निमित्तानें चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांतील किंमतीविषयींचें धोरण व आर्थिक विकास ह्या विषयावर चर्चा घडवून आणण्यांत आली. ह्या चर्चेत नियोजनविषयक तज्ज्ञ, अर्थशास्त्रज्ञ आणि उद्योगपति ह्यांनीं भाग घेतला होता. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालखंडांत किंमतीविषयीं खंबीर धोरण स्वीकारण्यांत यावें, अशी भूमिका बहुतेकांनीं घेतली. चर्चेला प्रारंभ करतांना नियोजन समितीचे उपाध्यक्ष श्री. अशोक मेहता म्हणाले कीं, किंमतीविषयींचें सोयीस्कर धोरण अमलांत आणतांना सामाजिक–आर्थिक विचारांची दखल घेण्यांत आली पाहिजे. पण तत्पूर्वी देशांतील उत्पादनक्षमता वाढविण्यांत आली पाहिजे. त्यासाठीं उत्पादन पद्धतीचा पाया अधिक खोल आणि विविधरूपी करण्यांत आला पाहिजे. उत्पादनाच्या सुधारलेल्या पद्धती स्वीकारून त्यामधील अडचणी दूर करण्यांत आल्या पाहिजेत. येती आणखी कांहीं वर्षें तरी विकासाच्या प्रक्रियेंत त्रास सहन करावा लागणार आहे आणि समाजांतील कोणत्या ना कोणत्या तरी थराला त्याग करावा लागणार आहे. समारोप करतांना मंडळाचे संचालक डॉ. लोकनाथन् म्हणाले कीं शेतीच्या मालाच्या किंमतींना स्थैर्य प्राप्त करून देण्यास अग्रहक्क देण्यांत आला पाहिजे. कारण, उद्योगधंद्यांना लागणाऱ्या बहुतेक कच्च्या मालाचें उत्पादन शेतीच्या भरभराटीवर सर्वस्वी अवलंबून आहे. राष्ट्रीय, आर्थिक आणि सामाजिक दृष्टीनें विचार करून किंमती स्थिर करण्यासाठीं सूचना देणाऱ्या एका राष्ट्रीय बोर्डाची स्थापना करण्यांत यावी. कारण, शेतीच्या मालाच्या किंमती स्थिर राखण्यांत येणाऱ्या यशावर नियोजनाचें यशापयश अवलंबून आहे, हें उघड आहे.

## मुंबईच्या हुंडीबाजारांत अस्वस्थ वातावरण

काळ्या पैशाच्या शोधासाठीं सरकारनें झडत्या घेण्यास सुरुवात केल्यापासून मुंबईच्या हुंडीबाजारांत एक प्रकारचें अस्वस्थतेचें व अनिश्चिततेचें वातावरण पसरलें आहे. ह्या बाजारांतील विश्वासच ढासळून गेला आहे. त्याचा परिणाम मुलतानी बँकर्सवर झाला आहे. असे २५० बँकर्स असून त्यांचा धंदा जवळजवळ बसल्यासारखाच झाला आहे. व्यापारी व धंदेवाईक लोक ह्यांना कमीअधिक प्रमाणांत कर्जें नेहमींच काढावीं लागतात. पण त्यांना आतां कर्जें मिळत नाहींशीं झालीं आहेत. सुमारें ३० हजार व्यापाऱ्यांच्या धंदेवाईक हालचालींना त्यामुळें खीळ पडली आहे. मोटारींचे सुटे भाग तयार करणारे कारखानदार, धान्य व्यापारी आणि कापड व्यापारी ह्यांच्या धंद्यांवर विशेष वाईट परिणाम झाला आहे. त्यामुळें बँकांकडून कर्जें मिळविण्याच्या प्रयत्नांना भरती आली आहे. पैशाची, म्हणजे कर्जाची मागणी वाढत असल्यामुळें खुद्द बँकांनासुद्धां पैशाच्या तात्पुरत्या सोयींची कांस धरावी लागत आहे. त्यामुळें मुंबईमधील पैशाच्या बाजारांत टंचाई भासूं लागली आहे. परिणामीं, इंटर-बँक कॉल मनीचा व्याजाचा दर ४½ टक्क्यांवरून ५ टक्क्यांपर्यंत वाढला आहे. हुंडीबाजारांत दररोज सुमारें १ कोटी रुपयांची उलाढाल होत असे. परंतु काळ्या पैशासाठीं धाडी घालण्याचें सत्र सुरू झाल्यापासून रोजची उलाढाल ५० लाखांपर्यंत गडगडली आहे. आणखी कांहीं आठवड्यांनीं तर ही उलाढाल पूर्णपणें थांबेल असा संभव दिसत आहे.

## अन्नधान्याची पुरामुळें होणारी नासाडी

हिंदमधील अन्नधान्याची नासाडी होण्याच्या कारणांत पुरांचा भाग बराच मोठा आहे. पण तो चटकन् लक्षांत येत नाहीं. मध्यवर्ती पूरनियंत्रण मंडळाच्या बैठकींत अध्यक्ष ह्या नात्यानें बोलतांना भारत सरकारचे शेती व बीजमंत्री श्री. के. एल्. राव ह्यांनीं प्रस्तुत विषयासंबंधीं माहिती निवेदन केली. ते म्हणाले कीं दरवर्षी नद्यांना आलेल्या पुरांपुळें अन्नधान्याचा फार मोठ्या प्रमाणावर नाश होत असतो. नाश थांबविण्याचे प्रयत्न तांतडीनें करण्यांत आले पाहिजेत. दरसाल सुमारें ४५ कोटी रुपये किंमतीच्या अन्नधान्याचा नाश जलप्रलयामुळें होत असावा असा अंदाज आहे. इतक्या किंमतीचें म्हणजे १० लाख टन अन्नधान्य ह्या कारणानें वायां जात आहे. भारताला अन्नधान्याचा जो दरसाल तुटवडा पडतो त्याच्या २० ते २५ टक्के धान्य पुरामुळें नष्ट होत असतें. म्हणून पुराचें नियंत्रण करण्यासाठीं योग्य उपाय शोधून काढण्यांत येऊन त्यांची टप्प्याटप्प्यानें अंमलबजावणी करण्यांत आली पाहिजे. निरनिराळीं राज्यें आपआपल्या परीनें अन्नधान्याच्या टंचाईचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीत आहेत. गेल्या १० वर्षांत ह्या दृष्टीनें हातीं घेण्यांत आलेल्या पूरनियंत्रक योजनांचें काम लक्षांत भरण्यासारखें झालें आहे. परंतु अजूनहि पुष्कळच काम करावयाचें शिल्लक आहे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस ज्या विभागांत पुरामुळें अन्नधान्याची नासाडी होते, त्यांपैकीं २५ टक्के प्रदेशांस पुरापासून बचावण्यासाठीं शक्य ते उपाय योजण्यांत येतील. पुराप्रमाणें पाणथळ जमिनींतील पाण्याचा निचरा करण्याचें कामहि राज्यसरकारांनीं हातीं घेणें जरुरीचें आहे. सर्व देशांतील अशा जमिनींमधील पाणी काढून लावण्यासाठीं सुमारें १०० कोटी रुपये खर्च करावे लागतील; तरच त्या लागवडीस योग्य होऊं शकतील.

## चित्रपट-निर्मात्यांचा नव्या चेहऱ्यांसाठीं शोध

फिल्मफेअर आणि युनायटेड प्रोड्यूसर्स ह्यांनीं ' नव्या चेहऱ्यांची ' स्पर्धा ठेवली आहे, त्यांत भाग घेण्यासाठीं दररोज २०० ते ३०० अर्ज येत आहेत. अर्जदारांत कित्येक परदेशांतील आहेत. सध्यां चित्रपटांच्या धंद्यांत नव्या नट–नटींचा तुटवडा पडला आहे त्यावर ही उपाययोजना आहे. सर्व स्पर्धकांतून चार तरुण व चार तरुणी निवडण्यांत येतील. अर्ज पाठविण्याची मुदत १५ मार्चअखेर आहे.

## बेळगांव बँक लि. ची १९६४ मधील उत्कृष्ट प्रगति

दि बेळगांव बँक लि. नें ३१ डिसेंबर, १९६४ अखेर संपलेल्या वर्षी उत्कृष्ट प्रगति केली आहे. नोकरवर्गाला बोनस देऊन आणि मागील वर्षातून पुढें आणलेला शिलकी नफा (रु. १०७८·४५) धरून, निव्वळ नफा रु. २,२९,२१४·२९ उरला; गेल्या वर्षी तो रु. १,७४,०७८·४५ होता.

९% करपात्र डिव्हिडंड, गेल्या वर्षीप्रमाणेंच, डायरेक्टरांनीं सुचविलें आहे, त्याला रु. ७२,००० लागतील. गंगाजळींत रु. ५०,००० ची भर पडेल; गेल्या वर्षी त्यांत रु. ३५,००० ची भर पडली होती. डिव्हिडंड ई. फंड रु. १२,००० (रु. ४,०००), इन्व्हेस्टमेंट फ्लक्च्युएशन फंड रु. ६,१२० (रु. शून्य), ग्रॅच्युइटी फंड रु. ५,००० (रु. शून्य), कॉंटिजन्सी रिझर्व्हज रु. ५,००० (रु. शून्य), पुढील वर्षांत ओढलेली शिल्लक रु. ३,००४·२९ (रु. १,०७८·४५) अशी इतर नफा वांटणी आहे. (कंसांतील आकडे गेल्या वर्षाच्या नफावांटणीचे आहेत.)

बँकेकडील ठेवींत ३७ लक्ष रुपयांची भरघोस वाढ झाली असून ठेवींची रक्कम २३० लक्ष रुपयांवरून २६७ लक्ष रुपयांवर गेली आहे. पूर्वीच्या वर्षी दिलेलीं कर्जें १३५ लक्ष रुपयांचीं होतीं; आतां तीं १४९ लक्ष रुपयांचीं आहेत. खेळतें भांडवल २७२ लक्ष रुपयांचें ३१६ लक्ष रुपये झालें आहे. मुंबई येथें दि. २५ फेब्रुवारी १९६५ रोजीं उघडण्यांत आलेली शाखा धरून बँकेच्या आतां २८ शाखा झाल्या आहेत. रिझर्व्ह बँकेच्या स्कीमप्रमाणें, अहवालाच्या वर्षी श्री. जडेया शंकरलिंग बँक लि., विजापूर, ही बँक बेळगांव बँक लि. मध्यें विलीन झाली.

---

### न्यूयॉर्क येथील जागतिक प्रदर्शनाचे हिशोब

१९६४–६५ च्या न्यूयॉर्क जागतिक प्रदर्शनाचें उद्घाटन गेल्या एप्रिलमध्यें झालें आणि ऑक्टोबरमध्यें प्रदर्शनाला हिवाळ्याची सुटी झाली. ह्या मुदतींत २·७ कोटी प्रेक्षक प्रदर्शनें पाहून गेले. मूळ अपेक्षा ४ कोटी प्रेक्षकांची होती. ५·३ कोटी डॉलर्सचा सबंध मुदतींत वाढावा उरेल, अशी कल्पना. आतांपर्यंतचा वाढावा फक्त १·२ कोटी डॉलर्स एवढाच आहे. वाढाव्यांतून, न्यूयॉर्क शहरांत उद्यानेंच उद्यानें निर्माण करण्याचा हेतु फारसा सफल होण्याची शक्यता दिसत नाहीं; उलट, प्रदर्शनाच्या हिशेबासंबंधीं तक्रारी मात्र वाढल्या आहेत. प्रदर्शनाच्या आर्थिक सल्लागार मंडळांतील नऊ सभासदांपैकी पांचजण बँकर्स आहेत; त्या सर्वांनीं राजीनामा दिला आहे. प्रदर्शनाच्या खासगी कॉर्पोरेशनचा अध्यक्ष, रॉबर्ट मोझेस, हा सल्लागार मंडळाला हवी ती माहिती पुरवीत नाहीं, अशी तक्रार आहे. "प्रदर्शन मोडणारे नको आहेत, उचलून धरणारे हवे आहेत" असें मोझेसचें त्याला उत्तर आहे. "आम्हांला ऑडिटरनें तपासलेले अहवाल हवेत" ह्या आमच्या मागणीचें हें उत्तर समाधानकारक नाहीं, अशी फर्स्ट नॅशनल सिटी बँकेचे अध्यक्ष जॉर्ज एस. मूर ह्यांची त्यावर प्रतिक्रिया आहे. प्रदर्शनाच्या उत्तरार्धांत पहिल्यापेक्षा जास्त प्रेक्षक येतील ही मोझेसची अपेक्षा कितपत फलद्रूप होते तें लवकर दिसेलच. प्रवेशाचें मूल्य ह्यापुढें २ डॉलर्सचें २½ डॉलर्स केलें आहे, हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे. नागरीहक्कासाठी उद्घाटनाच्या वेळीं झालेलीं निदर्शनें आणि प्रतिकूल हवामान, ह्यामुळें प्रदर्शनाच्या उत्पन्नांत घट झाली, असें चालकांचें म्हणणें आहे.


# महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.
## मुंबई

(दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित)

: मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई–१ टेलिफोन नं. २५५४७४–७५, २५६२१४ २५४७८१

: विभागीय कचेरी : महाल : नागपूर. तारेचा पत्ता : फार्मर बँक

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरी, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखर कारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | ... | ४ कोटी ८४ लाख |
| गंगाजळी व फंड | ... | १ कोटी ४३ लाख |
| ठेवी | ... | ३५ कोटी १४ लाख |
| खेळतें भांडवल | ... | ७५ कोटी ३५ लाख |

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

: बृहन्मुंबईतील शाखा :

(१) भायखळा (२) गोरेगांव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्लें (७) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शीव (१२) माटुंगा (१३) अंधेरी.

वि. म. जोगळेकर,
जनरल मॅनेजर.



# स्वस्तिकचा माल निर्यात होऊं लागला

—: कांहीं बोलके आंकडे :—

| | |
|---|---|
| १९६३ सालांतील मालाची विक्री | रु. १ कोटी, २ लक्ष |
| १९६३ अखेर वसूल भाग-भांडवल | रु. ४३,८१,४८५ |
| कामगारांची संख्या | १,१०० चे वर |
| कारखान्याच्या बांधलेल्या जागेचें क्षेत्रफळ | १,१०,००० चौ. फू. |

— प्रमुख उत्पादनें —

गमबूट्स—होजपाईप्स—प्रेशर होजेस

ग्लोव्हज—इरेझर्स—ऑईल सील्स

व

स्वरूप केबल्स

# स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्स लि.

स्वस्तिक गृह, खडकी, पुणें ३.

(टेलिफोन नं. : ५५२०१)

## राजाचा भत्ता इंडेक्स नंबराप्रमाणें वाढणार

युरोपांतील राजे आणि राण्या ह्यांना खासगी उत्पन्न मोठें असतें आणि त्यामुळें ते श्रीमंत असतात. त्यांत पुनः त्या त्या देशाचें सरकार त्यांना खर्चासाठी वार्षिक भत्त देते, राजवाड्यांतील नोकर-चाकरांचे पगार देते, इतरहि कांहीं खर्चाची तरतूद करते. बेल्जमनें आपल्या राजाचा भत्ता नुकताच ८,४०,००० डॉलर्सचा १०,००,००० डॉलर्स केला आहे. राहणीच्या खर्चाच्या इंडेक्सप्रमाणें ह्या भत्त्यांत वाढहि होणार आहे. शेजारच्या राजे-राण्यांपेक्षा बेल्जमच्या राजाचा भत्ता जास्त आहे. नेदरलंड्सच्या ज्युलिआनाला ७,००,००० डॉलर्स मिळतात, स्वीडनच्या गस्ताव्हला ५,१०,००० डॉलर्स दिले जातात आणि डेन्मार्कच्या फ्रेड्रिकला ४,९०,००० डॉलर्स मिळतात. ह्या उलट, इंग्लंडच्या राणी एलिझाबेथला १३,३०,००० डॉलर्स मिळतात.

---

## लष्करी कारखान्याचा सुवर्ण महोत्सव

लष्कराला लागणाऱ्या अनेक प्रकारच्या मालाचें उत्पादन करणाऱ्या शहाजहानपूर येथील कारखान्याचा सुवर्ण महोत्सव नुकताच साजरा करण्यांत आला. हा कारखाना १९१४ सालीं स्थापन करण्यांत आलेला असून तो मुख्यतः बर्फमय प्रदेशांत सैनिकांना लागणारें कापडचोपड तयार करतो. १९६२ सालीं भारतावर चीनचें आक्रमण झाल्यापासून कारखाना अहोरात्र उत्पादन करूं लागला. त्यामुळें त्यांतील उत्पादन पूर्वी कधींहि नव्हते इतकें वाढलें आहे. कारखान्यांत सुती कापड आणि वैमानिकांच्या छत्र्यासाठी लागणारें चिवट कापडहि तयार करण्यांत येतें. अशाच प्रकारचे आणखी दोन कारखाने अनुक्रमें कानपूर व आवडी ह्या ठिकाणीं आहेत. शहाजहानपूर येथील कारखाना चालू करण्यांत आला, त्या वेळीं तेथें अवघे १७५ कामगार कामावर होते; आतां रोजगारीवर असलेल्या कामगारांची संख्या १२,००० पर्यंत वाढली आहे.

---

## कुटुंबनियोजनाच्या कार्यक्रमाला मदत

हिंदुस्थानपुढील वाढत्या लोकसंख्येचा प्रश्न सोडविण्यास मदत करण्यासाठीं संयुक्त राष्ट्र संघटनेनें भारत सरकारच्या विनंतीप्रमाणें एका तांत्रिक मदत मंडळाची नियुक्ति केली आहे. संघटनेनें नेमलेलें अशा प्रकारचें हें पहिलेंच मंडळ असून, तें भारत सरकारच्या आरोग्य खात्याच्या आणि नियोजन समितीच्या सहकार्यानें काम करणार आहे. हें मंडळ १९५२ पासून कुटुंबनियोजनाविषयीं झालेल्या कामाचा आढावा घेईल. त्याचप्रमाणें कुटुंबनियोजनविषयक कार्यक्रमांची आखणी करण्यासाठीं नव्या पद्धती सुचवील. नव्या पद्धतीचे कार्यक्रम अंमलांत आणण्यासाठीं माणसें शिकवून तयार करण्याचें कामहि तें करील. भारताचा दोन महिने दौरा करून कांहीं निवडक शहरें आणि ग्रामीण विभाग ह्यांना मंडळ भेट देईल. ह्या क्षेत्रांत काम करणाऱ्या बिगर-सरकारी संघटनांशींहि मंडळ संपर्क ठेवील.

---

## काथ्याच्या मालाच्या निर्यातीला वाव

मद्रासमध्यें त्या राज्यांतील व केरळमधील काथ्याच्या वस्तूंचें प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें. ह्या वस्तूंत घरगुती उपयोगाच्या, शोभेच्या आणि औद्योगिक उपयोगाच्या अशा सर्व प्रकारच्या वस्तू होत्या. अलीकडे परदेशांत काथ्यापासून तयार करण्यांत आलेल्या विविध प्रकारच्या वस्तूंना चोखंदळ गिऱ्हाइकांकडून चांगली मागणी येत आहे. मागणीप्रमाणें पुरवठा करतां आल्यास ह्या मालाला चांगली निर्यात पेठ मिळण्यासारखी आहे.


**सरदारगृह**

**मुंबईंत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.**

**मंगलकार्यें व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.**

— आमचीं वैशिष्ट्यें —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचें भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोयी.
* टिळक जन्म-शताब्दीदिनीं लोकमान्यांचें सरदारगृहांत केलेलें स्मारक.

फोन नं. :–३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [ तार–सरदारगृह

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.




भारतातील प्रमुख नागरी सहकारी बँक!

**सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल ... | रु. | १० लाख |
| रिझर्व्ह व इतर फंडस् ... | रु. | १५ „ |
| ठेवी ... | रु. | ४१४ „ |
| खेळतें भांडवल ... | रु. | ४५० „ |

शाखा : फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणें व बेळगांव. महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, निकदवरी लेन, मुंबई ४.




स्थापना १९१८




महाराष्ट्र सरकारनें तगाईवर मंजूर केलेले

**"विजय" नांगर**

वापरा. ४, ६ व ८ बैली फाळ व सुटे भाग



तसेंच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपलड, शिवाय

बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट इ. इ.

**— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —**

विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )

# विविध माहिती

**मधुमेहाच्या रोग्यांना चालणारा तांदूळ**—कटक येथील तांदूळ संशोधन केंद्रानें मधुमेहाच्या रोग्यांनीं खाण्यास योग्य अशा प्रकारच्या तांदुळांच्या जातीचा शोध लावला आहे. बाजारांतील इतर प्रकारच्या तांदुळापेक्षा ह्या तांदुळांत प्रथिनाचें प्रमाण दुप्पट आहे. मधुमेहाच्या रोग्यांना कडक पथ्य पाळावें लागून तांदूळाचा आहार वर्ज्य करावा लागतो. पण ह्या नव्या प्रकारच्या तांदुळाच्या वापरानें रोग्यांना आहाराच्या संवयी बदलण्याचें कारण पडणार नाहीं.

**छोट्या उद्योगधंद्यांना जपानची मदत**—छोट्या उद्योगधंद्यांना लागणारी कांहीं महत्त्वाचीं यंत्रें विकत घेतां यावींत म्हणून भारताला चालू सालीं ४५ लाख रुपयांचें कर्ज देण्याची तयारी जपाननें दाखविली आहे. ह्या उद्योगधंद्यांत काम करण्यास लागणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना जपानमध्येंच शिक्षण देण्यांत आलें आहे. पुढील वर्षासाठींहि जपानकडून अधिक कर्ज मिळण्याची शक्यता आहे.

**जन्मदिन साजरे कशासाठीं करावयाचे?**—भारताचे उपाध्यक्ष डॉ. झकीर हुसेन ह्यांचा जन्मदिन ८ फेब्रुवारी आहे. त्या दिवशीं इष्टमित्रांकडून जन्मदिन साजरा करण्याचे प्रयत्न होतील म्हणून ते दिल्लींतून बाहेरच निघून गेले. संध्याकाळीं ते परत आले. त्यांनीं आपल्या बिऱ्हाडीं येणाऱ्या इष्टमित्रांसाठीं एक चिठ्ठी ठेवली होती. त्यांत "जन्मदिन साजरा करण्यापेक्षा अधिक महत्त्वाच्या गोष्टी मला करायला हव्यात," असें लिहिलें होतें.

**साखरेच्या निर्यातींत वांटा**—अमेरिकेच्या शेती खात्यानें निरनिराळ्या देशांकडून आयात करावयाच्या साखरेच्या वांट्याची माहिती प्रसिद्ध केली आहे. १९६५ मध्यें भारताकडून १ लाख १६४ टन साखर आयात करण्यास खात्यानें मंजुरी दिली आहे. गेल्या डिसेंबरमध्यें प्रसिद्ध झालेल्या आयातीच्या यादींत भारताला ८९.२२४ टन साखर मंजूर करण्यांत आली होती. १९६५ सालीं अमेरिका ९२ लाख टन साखर आयात करणार आहे. ही साखर ३१ देशांकडून आयात करण्यांत यावयाची आहे.

**जपानच्या साह्यानें कुष्ठाश्रम**—जपानमधील आशियाई कुष्ठरोग निवारण संघटनेतर्फे आग्र्याजवळ एक कुष्ठाश्रम उभारण्यांत येणार आहे. आश्रमाच्या कामास २ ऑक्टोबर ह्या दिवशीं म्हणजे गांधीजींच्या जन्मदिवशीं प्रारंभ करण्यांत येईल. आग्रा येथें असणाऱ्या जगप्रसिद्ध ताजमहालाच्या इमारतीपासून आश्रमाची संकल्पित जागा २ किलोमीटर अंतरावर आहे. एका इतिहासप्रसिद्ध ठिकाणाजवळ असला आश्रम काढण्याबद्दल बरेंच वादळ निर्माण झालें होतें. पण आतां तीच जागा निश्चित करण्यांत आली आहे.

**भारत इलेक्ट्रॉनिक्सचा नफा**—बंगलोर येथील भारत इलेक्ट्रॉनिक्स लि. ह्या कारखान्याला १९६३–६४ सालीं ५२.६१ लाख रुपये निव्वळ नफा झाला. गेल्या वर्षीं कारखान्याला ४३.८६ लाख रुपये नफा झाला होता. कारखान्यांत उत्पादनाला आरंभ १९५६ सालीं झाला. तेव्हांपासून त्याच्या उत्पादनांत सतत वाढ होत आली आहे. १९५६–५७ सालीं ५.९७ लाख रुपये किंमतीचें उत्पादन झालें होतें; तें १९६३–६४ सालीं ६२०.६५ लाखापर्यंत वाढलें आहे, १९६३–६४ सालीं ४६९.३१ लाख रुपये किंमतीच्या मालाची विक्री करण्यांत आली. त्यामागील सालीं ३६०.६५ लाख रुपयांच्या मालाची विक्री झाली होती.

**हाल्दिआ येथील कारखाना**—हाल्दिआ येथें काढण्यांत यावयाच्या तेलशुद्धीच्या कारखान्यांत दरसाल २५ लाख टन तेल शुद्ध करणारी यंत्रसामग्री बसविण्यांत येणार आहे. १९७०–७१ पर्यंत वाढत जाणारी तेलाची मागणी लक्षांत घेतां इतक्या उत्पादनक्षमतेची आवश्यकताच आहे. ह्या कारखान्याची उभारणी करण्यासाठी आणि आनुषंगिक धंदे काढण्यासाठीं रुमेनिआनें तयारी दाखविली आहे.

**पंजाबमध्यें बिडाच्या लोखंडाचा कारखाना**—तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस पंजाबमध्यें बिडाच्या लोखंडाचा एक कारखाना काढण्यांत यावयाचा आहे. कारखान्याच्या उभारणीसाठीं ४.७० कोटी रुपये भांडवल लागेल, असा अंदाज करण्यांत आला आहे. ह्या रकमेंतील ६० लाख रुपयांची रक्कम परदेशी चलनाच्या रूपांत लागेल. कारखाना स्थापन करण्याच्या कामीं ब्रिटन, फ्रान्स व रुमेनिआ ह्या देशांनीं तांत्रिक मदत देऊं केली आहे.

**खताच्या कारखान्यांचा पुरवठा**—भारताकडून रुपयाच्या चलनांत किंमत घेऊन खताचे कारखाने पुरविण्याची तयारी पोलंडनें दाखविली आहे. प्रत्येक कारखान्याची उत्पादनक्षमता २ लाख टनांची असेल, आणि पुरवठ्याचा करार झाल्यापासून दोन वर्षांच्या अवधींत ते प्रत्यक्ष उत्पादन करूं लागतील. कारखान्यांची यंत्रसामग्री पुरवून त्याशिवाय हिंदी तंत्रज्ञांना ती वापरण्याचें शिक्षणहि पोलंड देणार आहे.

**विन्स्टन चर्चिल ह्यांचें मृत्युपत्र**—ब्रिटनचे दिवंगत राष्ट्रपुरुष मि. विन्स्टन चर्चिल ह्यांनीं आपल्या मृत्युपत्रांत २ लाख ६६ हजार पौंड किंमतीची मालमत्ता ठेवली आहे. महत्त्वाचे राजकीय कागदपत्र आणि व्यक्तिगत जीवनाविषयींचे कागदपत्र त्यांनीं १९४६ मध्यें स्थापन केलेल्या एका ट्रस्टला दिले आहेत. बाकीचे कागदपत्र व त्यांना देण्यांत आलेलीं पदकें व इतर गौरवदर्शक वस्तु त्यांनीं आपल्या पत्नीला तिच्या हयातीपर्यंत दिल्या आहेत.

**रत्नागिरी जिल्ह्यांत अल्युमिनमचा कारखाना**—रत्नागिरी जिल्ह्यांत अल्युमिनमच्या एका कारखान्याची उभारणी भारत सरकार करणार आहे. कारखान्याची जागा अद्याप निश्चित करण्यांत आलेली नाहीं. कारखान्याच्या उभारणीसंबंधींचा अहवाल तयार झाला असून परदेशी कारखानदारांचें सहकार्य मिळविण्यासाठीं वाटाघाटी चालू आहेत. ह्याशिवाय, जिल्ह्यांत एक बिडाच्या लोखंडाचा व एक कांचेचा कारखाना काढण्यांत येणार आहे. हे दोन कारखाने आणि एक कापडाची गिरणी खाजगी विभागांत काढण्यांत येतील.

**परदेशी प्रवाशांमुळें कमाई**—१९६४ सालीं सुमारें १॥ लाखावर परदेशीय हौशी प्रवाशांनीं भारताला भेट दिली. त्यांनीं हिंदमध्यें केलेल्या खर्चामुळें भारताला २३ कोटी रुपयांचे परदेशी चलन मिळालें असा अंदाज आहे. परदेशीय प्रवाशांना अधिक सुखसोयींचा लाभ करून देतां यावा म्हणून हिल्टन इंटरनॅशनल ह्या अमेरिकन कंपनीशीं भारत सरकारच्या वाटाघाटी चालू आहेत. भारतामधील भांडवलदारांशीं सहकार्य करून हौशी परदेशी प्रवाशांची सोय करण्यास ही अमेरिकन कंपनी तयार आहे.

## दृष्टिक्षेपांत रेल्वेचा अर्थसंकल्प

(आंकडे कोटी रुपयांचे)

| | पक्के आंकडे १९६३–६४ (१) | अर्थसंकल्प १९६४–६५ (२) | दुरुस्त अर्थसंकल्प १९६४–६५ (३) | अर्थसंकल्प १९६५–६६ (४) |
|---|---|---|---|---|
| वाहतुकीचें एकूण उत्पन्न | ६३२·२१ | ६६८·०० | ६६०·०० | ७१६·०० × |
| चालू खर्च निव्वळ (वसूल व्हावयाच्या किंवा देणें असलेल्या रकमा विचारांत घेऊन) | ३९२·१३ | ४१४·६८ | ४३२·६८ | ४५७·८४ |
| महसुलांतून घसारा राखीव निधींत जमा | ८०·०० | ८३·०० | ८३·०० | ८५·०० |
| सेवानिवृत्ति वेतन निधींत जमा | — | १९·०० | ११·५० | १२·०० |
| निव्वळ संकीर्ण खर्च (महसूल खातीं खर्च टाकलेल्या बांधकामाचा खर्च धरून) | १४·८९ | १७·२२ | १५·८१ | १६·०२ |
| एकूण | ४८७·०२ | ५३३·९० | ५४२·९९ | ५७०·८६ |
| निव्वळ रेल्वे महसूल | १४५·१९ | १३४·१० | ११७·०१ | १४५·१४ |
| सर्वसाधारण महसुलांत जमा | | | | |
| (अ) रेल्वेंत गुंतविलेल्या भांडवलावरील लाभांश | | | | |
| (१) ४·२५ टक्के १९६२–६३ साठी | | | | |
| (२) ४·५० टक्के १९६३–६४ साठी | | | | |
| (३) ५·७५ टक्के १९६४–६५ ,, | | | | |
| आणि १९६५–६६ मधील नव्या भांडवलावर | ८३·४५ | ९०·७३ | ९२·०२ | १०३·४० |
| (ब) उतारू भाडें | | | | |
| करापोटीं राज्यांना द्यावयाची रकम | १२·५० | १२·५० | १२·५० | १२·५० |
| निव्वळ शिल्लक | ४९·२४ | ३०·८७ | १२·४९ | २९·२४ |

× उतारू भाडें दरांत आणि वाहतुकीच्या दरांत सुचविलेल्या फेरफारामुळें २१ कोटी रुपयांची वाढ महसुलांत होणार आहे. त्याचा समावेश वरील आंकड्यांत करण्यांत आला आहे. ही वाढ उतारू भाड्यांमुळें १३.५० कोटी रुपये, मालवाहतुकीमुळें ६.९० कोटी रु. आणि इतर वाहतूक उत्पन्नामुळें ६० लक्ष रुपये अशी आहे.

### उतारूंच्या भाड्यांत वाढ

सन १९५१ पासून उतारू भाड्यांत फक्त १९६२ मध्येंच काय ती वाढ झाली आहे. दूर अंतरांचा प्रवास करणाऱ्यांसाठी भाडेदरांत, वाढत्या अंतरांसाठी कमी प्रमाणांत वाढ या पद्धतीनें, जी वाढ १९५५ मध्यें करण्यांत आली ती रेल्वे खात्याला कोणत्याहि प्रकारचें जादा उत्पन्न मिळण्याच्या हेतूनें नव्हती. १९५७ मध्यें उतारू भाड्यावर कर आकारण्यांत आला तोहि रेल्वे खात्याच्या फायद्यासाठी नव्हे, तर राज्य सरकारांच्या फायद्याकरतां होता. रेल्वेंना येणाऱ्या खर्चाशीं तुलना करतां, या अर्थसंकल्पांतील, संकल्पित वाढ ही अत्यल्पच म्हटली पाहिजे. करासुद्धां तिसऱ्या वर्गाच्या (ऑर्डिनरी) सरासरी भाड्यांत फक्त १९ टक्के वाढ झाली आहे. मेलगाड्यांच्या तिसऱ्या वर्गाच्या भाड्यांत ही वाढ २६ टक्के, दुसऱ्या वर्गाकरतां २५ टक्के नि पहिल्या वर्गासाठी ३५ टक्के आहे. याउलट, उतारू वाहतुकीसाठी येणाऱ्या खर्चांत १९५१–५२ शीं तुलना करतां, १९६३–६४ मध्यें ५० टक्क्यांहून अधिक वाढ व १९६४–६५ मध्यें त्यापेक्षाहि जास्त वाढ झाली आहे. १९६५–६६ चा विचार करतां हा खर्च अधिकच वाढणार आहे. कारण, निरनिराळ्या खात्यांवर, विशेषत: नोकरवर्गासाठी महागाईभत्ता व इतर भत्यापोटीं खर्चांत वाढ होणार आहे. नव्या एकूण दरवाढीमुळें उत्पन्नांत २१ कोटी रुपयांची भर पडणार आहे.

### रेल्वे योजनेची प्रगति

आणीबाणी जाहीर झाल्यामुळें सिलीगुरी–हळदीबारी ह्या रेल्वे विभागाचें ब्रॉडगेजमध्यें रूपांतर करण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें तें काम पूर्ण होऊन वाहतुकीला सुरुवात झाली आहे. जोगिघोपा-पर्यंतचा ब्रॉडगेजमार्ग या वर्षाच्या मध्यापर्यंत पूर्ण होईल असा अंदाज आहे. फराक्का व सेजुरिया घाट यांमधील उताराची क्षमता या वर्षाच्या मध्यापर्यंत दुप्पट होईल. त्याचप्रमाणें सैथिया व बऱ्हाबा यांमधील साहिबगंज लूप दुहेरी करण्याच्या कामाची चांगली प्रगति झाली आहे. यामुळें आसाममधील रेल्वे मार्गावरील वाहतुकीची क्षमता वाढण्याच्या दृष्टीनें चांगला उपयोग होईल व बरौनी व कटिहार मार्गे मीटरगेजवरूनहि आसाममध्यें वाहतूक चांगली वाढेल. बाँगाईगांव व चंगसाणी यांमधील मीटरगेज मार्गावर एकत्रिक वाहतूक नियमन केल्यानंतर त्यामध्यें विशेष फरक दिसून येईल.

---

### मुख्य मार्ग दुहेरी करण्यावर भर

दिल्ली–मद्रास, दिल्ली–मुंबई, दिल्ली–कलकत्ता व कलकत्ता–नागपूर–मुंबई हे मुख्य मार्ग बहुतांशी दुहेरी करण्यांत आलेले आहेत. पेंच, चांदा व सिंगरानी कोळसा खाणी प्रदेशांचा विकास झाल्यामुळें वाहतुकींत चांगलीच वाढ झाली आहे. वाढत्या वाहतुकीची गरज भागविण्यासाठी ग्रँड ट्रंक मार्गावर डिझेल ट्रॅक्शन सुरू करण्यांत येईल.

सन १९६६ च्या एप्रिलच्या सुमारास ग्रँड कॉर्ड मार्गे कलकत्ता डाक्स ते कानपूर मार्गाचे विद्युतिकरण पुरें होईल नि दूरच्या कांहीं प्रवाशी गाड्यांना विद्युत इंजिनें जोडण्यांत येतील.

---

### यमुनेवर दुसरा पूल

दिल्ली व आसपासच्या विभागामध्यें वाहतुकींत मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे. मालगाड्यांना दुसऱ्या मार्गावरून जातां यावें व प्रवासी वाहतुकींत गोंधळ होऊं नये म्हणून दिल्ली–नवी दिल्ली या विभागांत तशी व्यवस्था करण्यांत येत आहे. तसेंच, यमुना नदीवर दुसरा पूलहि बांधण्यांत येणार आहे.

**बिहारमधील खाणमजूर**—बिहार राज्यांतील खाणींत रोजगार देतांना बिहार राज्यांत वास्तव्य करणाऱ्या लोकांनाच प्राधान्य देण्यांत यावें, असें पत्रक राज्य सरकारनें अलीकडे काढलें होतें. कलकत्ता येथें पूर्वविभाग समितीची बैठक भरली असतांना ह्यासंबंधीं चर्चा करण्यांत आली आणि रोजगारी देतांना वास्तव्याच्या विचाराला अग्रहक्क देण्यांत येऊं नये असें बहुमत दिसून आलें. आतां हें पत्रक रद्द करण्यांत आलें आहे.

**जपानी बँका मदत देण्यास तयार**—दिल्ली येथें भरविण्यांत आलेल्या इंटरनॅशनल चेंबर ऑफ कॉमर्सच्या २० व्या अधिवेशनासाठी फयुर्जी बँक ऑफ जपानचे अध्यक्ष आले होते. पत्रकारांशीं भारत–जपान सहकार्याविषयीं बोलतांना ते म्हणाले कीं भारताचा विकास आधुनिक पद्धतीनें घडवून आणण्यासाठी जपान भारताच्या भांडवलाच्या बाजारपेठेंत प्रवेश करण्यास अतिशय उत्सुक आहे. जपान भारतांत एक पोलादाचा कारखाना काढण्यास तयार आहे. ह्यासंबंधीं जपानी बँकर्स आणि पोलाद कारखानदार ह्यांच्यांत बोलणींहि झालीं आहेत. जपानच्या सरकारकडून अगर पोलाद कारखानदाराकडून भारताला मोठें कर्ज मिळण्याची शक्यता कमी आहे. म्हणूनच जपानी बँका ह्या कामीं पुढाकार घेण्यास तयार आहेत. कारखानदारांच्या हितसंबंधांचें रक्षण होत असेल तर जपानच्या बँका त्यांना मदत देण्यास तयार आहेत.

**पाकिस्तानांतील चित्रपट महोत्सव**—लाहोर येथें आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव भरविण्यांत आला आहे. ह्या महोत्सवांत भारतातर्फे सत्यजित रे ह्यांचा 'महानगर' हा बोलपट दाखविण्यांत येणार आहे. पुढील महिन्याच्या मध्याच्या सुमारास महोत्सव ढाका येथें चालू करण्यांत येईल आणि नंतर तो कराचींत नेण्यांत येऊन त्याची समाप्ति करण्यांत येईल. ह्या महोत्सवांत राशिया, इराण, फ्रान्स, पोलंड, सीलोन, तुर्कस्थान, चीन, जपान, ब्रिटन, इत्यादि देश भाग घेणार आहेत.

**चीनचें पाकिस्तानला कर्ज**—पाकिस्तान व चीन ह्यांच्या दरम्यान चीननें पाकिस्तानला द्यावयाच्या कर्जाबद्दल करार झाला आहे. ह्या कराराप्रमाणें चीन पाकिस्तानला ६ कोटी डॉलर्स अथवा सुमारें २९ कोटी रुपये बिनव्याजी कर्ज म्हणून देईल. पाकिस्तान ह्या कर्जाची फेड २० वर्षांच्या कालांत मालाची निर्यात करून करणार आहे. कर्ज फेडण्यासाठी पाकिस्तानला आणखी १० वर्षें मुदत मिळण्याची शक्यता आहे.

**इराकला चहाची निर्यात**—इराक भारताकडून दरसाल सुमारें ४·५ कोटी पौंड चहा आयात करतो. इराकमधील चहाच्या खपाच्या १२ टक्के इतकें हें प्रमाण आहे. बाकीचा ८८ टक्के चहा सीलोनकडून घेण्यांत येतो. कारण, सीलोनचा चहा स्वस्त दरांत मिळू शकतो. भारतानें इराककडून अधिक प्रमाणांत खजूर घेतला, तर इराक भारताकडून अधिक चहा घेण्यास तयार आहे.


**वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

स्थापना : १९४५ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७२१००

**बचतीच्या आकर्षक योजना**

| | |
|---|---|
| ( १ ) स्पेशल सेव्हिंग | व्याजाचा दर ३॥ टक्के |
| ( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत | „ ३। „ |
| ( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें | „ ५ „ |

*मुदतीच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.*

मॅनेजर—ना. शं. कानिटकर






**बेडेकर**


मसाले, लोणचीं
व पापड
आपल्या जेवणांत
विशेष लज्जत
आणतील.

वापरून पाहा.
मुगभाट, मुंबई ४.
शाखा: ठाकुरद्वार, दादर,
कोट व परळ.



BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES

Make doubly sure
by fitting


GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA

MANUFACTURERS OF
MACHINE SPARE PARTS & TOOLS

## भारत सरकारचा १९६५–६६ चा अर्थसंकल्प

चालू करांनुसार जमाखर्चाचा विचार करतां, १९६५–६६ मध्यें एकंदरींत १०कोटी रुपये इतकी अल्पशी शिल्लक राहण्याची अपेक्षा आहे. या महसूल खातीं आगामी वर्षांत २११६ कोटी रुपये खर्च होतील असा अंदाज घरण्यांत आला असून, चालू सालच्या दुरुस्त अंदाजांतील आंकड्याहून ही रक्कम ११७ कोटी रुपयांनीं अधिक आहे. नुकत्याच बसविण्यांत आलेल्या आयात मालावरील १० टक्के सरचार्जच्या उत्पन्नासुद्धां चालू करानुसार आगामी वर्षांत २३५३ कोटी रुपये उत्पन्न मिळेल असा अंदाज आहे. म्हणजे महसूल खातीं २३७ कोटी रुपये शिल्लक राहण्याची अपेक्षा आहे. म्हणजे चालू वर्षापेक्षा सुमारें ८ कोटी रुपये जास्त शिल्लक राहतील. आगामी वर्षांत संरक्षणावर ७४९ कोटी रुपये खर्च करण्याचा विचार असून हा आंकडा चालू सालाच्यापेक्षा ३२ कोटी रुपयांनीं अधिक आहे. मुल्की खर्च १३६७ कोटी रुपये म्हणजे चालू वर्षापेक्षा ८५ कोटी रुपयांनीं अधिक होण्याची अपेक्षा आहे. खर्चांतील ही वाढ मुख्यत्वें, कर्जाच्या व्यवस्थेपोटीं ३८ कोटी रुपये, राज्यें व मध्य सरकारशासित प्रदेशांना मदत व आर्थिक साह्यापोटीं ३९ कोटी रुपये, प्रशासकीय खात्यांवर, विशेषतः पोलीस विभागावर ९ कोटी रुपये आणि समाजसेवा व विकास कार्यावर २० कोटी रुपये याप्रमाणें जादा खर्चाची तरतूद करण्यांत आल्याकारणानें दिसून येत आहे.

आगामी वर्षांत महसूल सुमारें १२५ कोटी रुपयांनीं वाढण्याची अपेक्षा आहे. ही वाढ नेहमींप्रमाणें उत्पन्नाच्या मुख्यत्वें पुढील बाबतींत होईल. प्राप्तिकर व कंपन्यांवरील करांपासून ७० कोटी रुपये, मध्यवर्ती सरकारच्या अबकारी करांपासून ५४ कोटी रुपये आणि इतर जकातींपासून २० कोटी रुपये याप्रमाणें जादा उत्पन्न होण्याची अपेक्षा आहे. याखेरीज सरकारी मालकीचे कारखाने, राज्य सरकार यांजकडून मिळणारें व्याजाचें उत्पन्न व रिझर्व्ह बँकेचा जादा नफा यांमुळें ३९ कोटी रुपये अधिक मिळतील.

### मांडवली खर्च १११४ कोटी रुपये

मांडवली खर्चाचा अंदाज १११४ कोटी रुपये घरण्यांत आला असून त्यामध्यें राज्य सरकारें व केंद्रशासित प्रदेशांना देण्यांत येणाऱ्या कर्जांखेरीज सर्व कर्जांचा समावेश आहे. हाहि आंकडा चालू सालापेक्षां १०४ कोटी रुपयांनीं अधिक आहे. रस्तेबांधणीवर २४ कोटी रुपये, अन्नधान्यांच्या खरेदीसाठी २३ कोटी रुपये, अणुशक्तीवर १५ कोटी रुपये, संरक्षणावर १२ कोटी रुपये आणि औद्योगिक विकास बँक १६ कोटी रुपये याप्रमाणें जादा तरतूद करण्यांत आल्याकारणानें भांडवली खर्चांत वाढ दिसून येत आहे.

### राज्यांना ७१२ कोटी रुपये मदत व कर्जें

राज्य सरकारें व केन्द्रशासित प्रदेशांना कर्जें देण्यासाठी म्हणून जवळजवळ यंदाच्या वर्षाइतकीच म्हणजे ७१२ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. तथापि, योजना खर्चाकरितां आगामी वर्षांत अधिक २८ कोटी रुपये कर्जाऊ दिले जातील आणि उत्पन्नाचे मार्ग व साधनें यांसाठी देण्यांत येणाऱ्या कर्जांची रक्कम त्या मानानें कमी असेल.

### २२२५ कोटी रुपये योजना खर्च

आगामी वर्षांत, पंचवार्षिक योजनांतर्गत कामांवर मध्य व राज्य सरकारें मिळून २२२५ कोटी रुपये खर्च करतील, म्हणजे चालू सालच्यापेक्षा २४१ कोटी रुपये अधिक खर्च होतील. राज्यांचा योजना खर्च १०२७ कोटी रुपये व मध्य-सरकारचा ११९८ कोटी रुपये होईल.

या अर्थसंकल्पांत २७० कोटी रुपयांचीं कर्जें उभारण्याची तरतूद करण्यांत आली आहे. चालू वर्षाचा हाच आंकडा ३९२ कोटी रु. आहे. बचत योजनांच्या सध्यांच्या प्रगतीनुसार आगामी वर्षांत त्यापासून १३५ कोटी रु. मिळतील असें गृहीत धरलें आहे. परकीय कर्जांचा आंकडा मात्र ६६९ कोटी रुपयांइतका असेल.

सध्यांच्या करयोजनेनुसार पुढील वर्षीं महसूल खातीं २३७ कोटी रुपये शिल्लक दिसले. भांडवली खात्यावर एकूण २०९४ कोटी रुपये खर्च होईल, यांत २६७ कोटी रुपयांच्या कर्जफेडीचाहि समावेश असेल. हा खर्च, महसुली शिल्लक वगळतां, देशांतून व परदेशांतून मिळून ९३९ कोटी रुपयांचीं कर्जें उभारून, बचत योजनांतून १३५ कोटी रुपये जमा करून, ३३४ कोटी रुपये कर्जांच्या परतफेडीपासून, पी. एल. ४८० निधींतून १९१ कोटी रुपये मिळवून, वर्षासन ठेवयोजनेंतून ६५ कोटी रुपये व इतर बाबींपासून २०३ कोटी रुपये मिळवून भागविला जाईल. अनेक वर्षांत प्रथमतःच पुढील वर्षीं सध्यांच्या करआकारणी योजनेनुसार एकूण अर्थसंकल्प कांहींसा शिलकीचा दिसून येण्याची अपेक्षा आहे.

---


### दि बँक ऑफ महाराष्ट्र लि., पुणें

रजि. ऑफिस—११७७ बुधवार पेठ, पुणें–२.

## नोटीस

नोटीस देण्यांत येते कीं, कंपनीच्या भागीदारांची ३०-वी वार्षिक साधारण सभा बुधवार दिनांक ३१ मार्च १९६५ रोजीं २–३० वाजतां ( भारतीय प्रमाण वेळ ) गोखले हॉल, ९४८ सदाशिव पेठ, लक्ष्मी पथ, पुणें शहर, या ठिकाणीं नेहमींच्या कामकाजासाठी म्हणजे दिनांक ३१ डिसेंबर १९६४ चा ताळेबंद व नफातोटापत्रक यांचा विचार करणें, डिव्हिडंड मंजूर करणें, निवृत्त होणाऱ्या संचालकांच्या जागीं संचालकांची निवडणूक करणें, हिशेब-तपासनिसांची नेमणूक करणें, वगैरे कामकाजासाठी भरेल. सभेपुढें येणाऱ्या कामकाजाचा तपशील भागीदारांस बँकेचा दिनांक ३१ डिसेंबर १९६४ अखेरचा ताळेबंद नफातोटापत्रक व संचालकांचा अहवाल स्वतंत्रपणें पाठविण्यांत येत आहे.

बोर्डाच्या हुकमावरून,
सी. व्ही. जोग.
पुणें, दि. ९ फेब्रुवारी १९६५ जनरल मॅनेजर.

---

सूचना—(१) बँकेची शेअर ट्रान्सफर बुकें बुधवार दि. १७ मार्च १९६५ ते बुधवार दि. ३१ मार्च १९६५ पर्यंत (दोन्ही दिवस धरून ) बंद राहतील.

( २ ) डिव्हिडंड मंजूर झाल्यानंतर तो दि. ३१ मार्च १९६५ रोजीं भागधारकांच्या रजिस्टरवर नांवें असलेल्या भागधारकांना दिनांक ९ एप्रिल १९६५ पासून दिला जाईल. डिव्हिडंड वॉरंटस भागधारकांच्या नोंदलेल्या पत्त्यावर पाठविलीं जातील. पत्ता बदलला असल्यास बँकेकडे सत्वर कळवावें.





दातांच्या स्वच्छतेसाठीं

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाविलास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.